| | | |
|---|---|---|
| पुणे पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | PUNE CITY TRAFFIC POLICE |

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./११८५२०२४** **दिनांक :- १२/०२/२०२४**

**प्रेसनोट**

**विषय :- गणेश जयंती निमित्त शहरातील मध्यवर्ती भागातील वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत**

मंगळवार दिनांक १३/०२/२०२४ रोजी, गणेश जयंती निमित्ताने फरासखाना वाहतूक विभागाचे हद्दीतील श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपती मंदिर येथे दर्शनाकरीता भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर भागातील शिवाजीरोड, लक्ष्मी रोड व इतर रोडवर वाहतूक वाढून सदर रोडवर वाहतुकीची कोंडी होऊन वाहतुक संथ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीत राहणेकरीता सदर परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, शशिकांत बोराटे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन **आवश्यकतेनुसार व तेथील वाहतुकीच्या परिस्थितीनुसार दि. १३/०२/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वा. पासून गर्दीसंपेपर्यंत सर्व प्रकारच्या** वाहतूकीत खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

**वाहतूकीतील बदल**

१) पुरम चौकातुन बाजीराव रोडवरुन शिवाजीनगरकडे जाणा-या वाहन चालकांनी पुरम चौकातून टिळक रोडने अलका टॉकीज चौक व पुढे एफ. सी. रोडने इच्छितस्थळी जावे.

२) शिवाजी रोड वरुन स्वारगेटला जाणारे वाहन चालकांनी स.गो.बर्वे चौकातून जंगली महाराज रोडने खंडोजीबाबा चौक – टिळक चौक – टिळक रोडने इच्छितस्थळी जावे

३) स. गो. बर्वे चौकातुन पुणे मनपा भवनकडे जाणारे वाहन चालकांनी स. गो. बर्वे चौकातुन जंगली महाराज रोडने झाशी राणी चौक डावीकडे वळुन इच्छित स्थळी जावे.

४) अप्पा बळवंत चौकातुन बुधवार चौकाकडे येणारी वाहतूक बंद करुन ती बाजीराव रोडने सरळ सोडण्यात येईल.

**( शशिकांत बोराटे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**